
डॉ. नितीन मोरे
HOSTEL-I
(HALL OF RESIDENCE)
प्रेमातुराणां

# प्रेमातुराणां

डॉ. नितीन मोरे

ई साहित्य प्रतिष्ठान

# प्रेमातुराणां

लेखक :डॉ. नितीन मोरे

Mobile No. 98209 37490, 98696 73415.

Email - drnmore@yahoo.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www. esahity. com

esahity@gmail. com

प्रकाशन : १५ ऑक्टोबर २०१७

©esahity Pratishthan®2017

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

**प्रेमातुरांणां.... !**

**प्रस्तावना**

तीस वर्षांपूर्वी आमच्या जीएस मेडिकल आणि त्याच्या कट्ट्याने आम्हाला खूप काही दिले.

आणि त्यात आता पर्यंत आठवणीत रहावे असे कित्येक क्षण ही..

तंत्रज्ञानाच्या ह्या जमान्यात कॉलेजची पोरं पोरी whatsappवर पुन्हा भेटली..

Virtually का असेना जुने दिवस आठवल्याशिवाय राहिले नाहीत.

त्यातील चर्चेचा एक विषय म्हणजे गर्ल्स होस्टेल ! आणि काही महाभागांनी त्यात केलेली घुसखोरी.

त्या दिवसांच्या nostalgic चर्चेतूनच या नाटकाला विषय मिळाला असे म्हणायला हरकत नाही.

त्या निमित्ताने काही तरूणपणातले ते क्षण डोळयांपुढे तरळून गेले.

प्रेमातुरांणां... हे एक हलकेफुलके यंग नाटक !

नवतरूण आणि सदातरूण.. दोघांनाही आवडायला हरकत नसावी !

**अर्पण पत्रिका**

कॉलेजच्या सोनेरी दिवसांतील साथी

आमच्या जीएस कट्ट्यास

आणि त्यावरील

मित्रमैत्रिणींस

स्नेहपूर्वक...

# प्रेमातुरांणां.... !

# अंक पहिला

## प्रवेश पहिला

एक होस्टेलची खोली. समोर लागून बाल्कनीवजा छोटी खोली, तिला लागून दरवाजा. बेड.. टेबल एक खुर्ची.. कपडे बदलायला पडदा वजा आडोसा.

'अनिरूद्ध' आणि 'बबन' दोन्ही कॉलेजविद्यार्थी. अनिरूद्ध अडसूल.. ऊर्फ ए आणि बबन बोबडे.. ऊर्फ बी.. भिंतीवर चित्रे. एकीकडे हनुमानाचे चित्र. त्याच्या खाली मोठ्या अक्षरात 'शुका सारखे पूर्ण वैराग्य ज्याचे' लिहीलेले.

दुसरीकडे तारूण्यसुलभ पण डिसेंट म्हणावीतशी चित्रे. टेबलाशी बसून अनिरूद्ध काहीतरी लिहीत बसलाय. बबन बाजूला बसून पेपर वाचतोय. भिंतीवर तारखांचे कॅलेंडर लटकलेले. बाजूच्या घड्याळात साडेनऊ झालेले.

**अनिरूद्ध :** (स्वत:शीच) वा! बहुत खूब ! ऐक....

जरूरी है..

जरूरी है..

हर ख्वाहिश पूरी करना

जरूरी है..

ये समझो ये

मजबूरी है..

हर ख्वाहिश पूरी करना..

जरूरी है..

हर ख्वाहिश..

**बबन :** हर? यू मीन.. हर.. इंग्रजीतली.. हर.. हर.. भ्रश्टाकार... तुझ्याकडून ही अपेक्षा नव्हती.. सुन तू बाल ब्रह्मचारी.. कौन ये कन्याकुंवारी..

**अनिरूद्ध :** नाही.. अजाण,अज्ञानी,मूढ इत्यादी इत्यादी बालका.. ही माझी लेटेस्ट!

**बबन :** जीएफ? ती ही लेटेस्ट? कितवी? छुपा रूस्तुम ! आणि आम्हाला वाटतंय हा बॉल ब्रह्मचारी.. नाही बाल ब्रह्मचारी !

**अनिरूद्ध :** अरे लेटेस्ट कविता..

**बबन :** ओह! तिचे नाव... कविता.. कविता.. ? छान कवितेवर कविता.. चालू दे.. गो ऑन ऍंड ऑन.. चारोळया नायतर हायकू.. मेरेको पूछता है कायकू... नाहीतर खंडकाव्य लिही.. महाकाव्य लिही.. नाहीतरी बाल ब्रह्मचारी एका वयानंतर चेकाळतातच !

**अनिरूद्ध :** हे वयानंतर काय? मी तुझ्याहून दहा दिवसांनी लहान आहे.. ते जाऊ दे मूढ बालक . आज तुझा वाढदिवस. माझा नंतर.. मी बोलतोय ती कविता .. ही ती नव्हेच..

**बबन :** मग कोण आहे? सविता.. बबिता.. रंजिता..

**अनिरूद्ध :** यावरून एक कविता आठवली.. ऎकवू का नाही विचारत.. ऎक.. ऎकच

**बबन :** तुझा रूम पार्टनर होण्याची ही सजा?

**अनिरूद्ध :** सजा म्हण मजा म्हण.. मन्मना नाही क्षिती.. ऎकच..

**बायको : प्रेमाची अस्तुरी**

’उज्ज्वला’ची ’कामना’

’श्रद्धा’ ’गीता’ वरी

’भावना’ची ’साधना’

’प्रीती’ ’कविता’ वरी

’प्रतिभा’ची ’प्रतिमा’

’भक्ती ’लक्ष्मी’ वरी

’ज्योती’ची ’पूजा’

’माया’ ’ममता’वरी

’अल्पना’ची ’कल्पना’

'मोहिनी' 'मुक्ता'वरी

'सोनिया'ची 'प्रेरणा'

'नयना' 'सविता' वरी

'ललिता'ची 'लीला'

'दर्शना' 'मंगला'वरी

'मृदुला'ची 'मंजिरी'

'कस्तुरी' 'करूणा' करी

'सपना'ची 'चांदणी'

'स्वप्ना'तच 'सुंदरी'

'शोभा' आपल्या घरी

'प्रेमा'ची अस्तुरी

**बबन :** कान धन्य झाले कविराज.. लहान मुलांना चड्डीत व्हावी सुसू.. तशी तुम्हा व्हावी कविता...

**अनिरूद्ध :** काय पण उदाहरण..

**बबन :** ते नको तर... एखाद्याला सर्दी व्हावी तशी तुम्हाला कविता होते. आता ठीक? तर... येऊ दे नवी कविता.. येऊ दे.. ( घड्याळाकडे पाहात ) आणि तू जाणार म्हणालास ना तो गेला नाहिस अजून..

**अनिरूद्ध :** जाईन.. पण आधी काव्य प्रसूती..

( दरवाजावरची बेल वाजते )

**बबन :** आली वाटते.. कविता..

( बोलत बोलत दरवाजा उघडावयाला जातो )

( बबन बाहेर दरवाजा उघडतो. अनिरुद्ध आत बसून आहे. बाहेर एक तरूणी उभी. साधी सुस्वरूप.. थोडी बालिश वाटेलसे बोलणारी पण तरतरीत आणि हुशार )

**बबन :** तू? ( गडबडतो ) तुम्ही? कोण? कोण तुम्ही? कोण हवंय तुम्हाला? ( बोलतोय ए साठी पण जणू बाहेरील मुलीला उद्देशून असे वाटते ) ए ए कोणतरी आलंय..

**मुलगी :** मी.. कविता कवी

**बबन :** ओ हो ! तुमच्याबद्दलच विचार.. नाही बोलत होतो.. होतो नाही होता.. हा अनिरूद्ध. (अनिरूद्धकडे आत पाहात, नंतर हळूच तिच्याकडे पाहात ) छान आहेस.. छान आहे.. नाहीतर ब्रह्मचारी चेकाळले की कोणाच्याही गळयात.. पडून मोकळे..

**अनिरूद्ध :** (आतून) कोण आहे रे?

**बबन :** वहिनी... म्हणू का?

**कविता :** (फणका-यात) हे पहा, तुम्ही कोणाला काय म्हणावे हा तुमचा प्रश्न आहे..

**बबन :** कवी.. कविता..

**अनिरूद्ध :** कोण आहे.. ( बाहेर येत ) या कोण?

**कविता :** मी कवी..

( तिघे आत येतात )

**अनिरूद्ध :** चुकताय तुम्ही. तुम्ही कवी असूच शकत नाही. इंपॉस..

**कविता :** का? का नाही असू शकत? एक हुशार..

**बबन :** आणि तरूण,सुंदर वगैरे..

**कविता :** (दुर्लक्ष करत) मुलीने कवी असू नये.. ? मी कविता.. कवी

**अनिरूद्ध :** थ्यांक्स.. मला उद्देशून म्हणताय कवी.. त्याबद्दल धन्यवाद. आणि तुम्ही कवी कशा काय? कवयित्री होऊ शकता. व्याकरण संभाळायलाच पाहिजे की नाही.. पण कवयित्री असणारच तुम्ही.. मी कवी.. ओळखल्याबद्दल थ्यांक्यू.. सकाळपासून मी कविता..

**बबन :** ( त्याचे वाक्य तोडत )पाडत बसलोय.. झा-यातून बुंदी पाडतात तशा.. उशीर झाला तरी बेहत्तर.. आधी लगीन कविते.. (जीभ चावत) पोएट्रीचे..

**अनिरूद्ध :** या जगास कवीची किंमत नाही. पण आम्ही असू लाडके.. देवाने दिधले..

**कविता :** जगत हे आम्हास खेळावया.. छान ! तर मी कविता कवी

**बबन :** कविराज.. त्यांचे आड... ना..

**अनिरूद्ध :** तू आमच्या सारख्या कविजनांच्या आड येऊ नकोस.. या कुत्सित बोलांची आम्हास काय तमा.. जा केली तुला क्षमा.. हो की  नाही हो.. उगीच इकडे आड.. येतात.. तिकडे विहीर..

**कविता :** हे पहा, मी काही कामानिमित्ताने..

**अनिरूद्ध :** कवीला हे जग दिसत नाही.. कामधाम... संसार विसरणारे आम्ही काव्य पुजारी..

**बबन :** ओम भवति.. भिक्षां देही.. भटजी बुवा.. पुजारीबुवांना कोणी जुळणा-या शब्दांची भिक्षा वाढा.. माये.. शब्द छान असोत वा सुंदर असोत असे नाही फक्त जुळणारे हवेत... नाही म्हणू नका.. पापी पेट का सवाल है..

**कविता :** हे पहा.. मी..

**अनिरूद्ध :** मी पणा सोडा.. कवियत्रीजी.. मी पण ज्यांचे पक्व फळापरी गळले.. हो..

**बबन :** हो? जांभूळ टपकावे तसे मी पण गळून पडते की काय?

( कविता एकाएकी आपला फोन बाहेर काढत त्याच्यावर बोलू लागते )

**कविता :** (फोनवर) हॅलो.. कविता हिअर.. हो हो.. रवि नाही हो.. कवी.. ओके.. लगेच.. येते.. निघतेच.. (दोघांकडे वळून) मी निघते.. येईन नंतर..

**अनिरूद्ध :** हं.. तुमचे ते काम.. ?

(न ऐकताच निघून जाते)

**बबन :** म्हण गाणे.. अभी न जाओ छोडकर..

**अनिरूद्ध :** काही.. ही तुझे.. किती चांगली होती.. कवी.. मला पाहताच ओळखले तिने.. मी कवी.. कवी तो दिसतो कसा आननी..

**बबन :** दिसतो कसा नाही.. दिसते कशी आननी.. मी सांगू.. छान.. वहिनीबाई..

**अनिरूद्ध :** कोण वहिनी.. या आजन्म ब्रह्मचा-यास..

**बबन :** याच कविता कवी.. वहिनी..

**अनिरूद्ध :** कवी.. कविता.. कोण?

**बबन :** कब.. क्यूं.. कहां.. तीच रम्य बाला.. उगीच नाही कलिजा खलास झाला..

**अनिरूद्ध :** इकडे विहीर तिकडे आड.. माझ्या काळजाला कसली भरलीय धाड..

**बबन :** तो बाल ब्रह्मचारी.. कवी और उसकी कविता! खूब जमेगा रंग..

**अनिरूद्ध :** तिला एक तरी ऐकवली असती रे कविता..

**बबन :** कविता कवितेला.. काहीतरीच.. म्हणतात ना.. काकूने काकाचे कामाचे कागद कराकरा कात्रीने कापले.. तसे.. कविता कवी काहीतरीच.. कविराज..

**अनिरूद्ध :** पण त्या रम्य बालेने बघताच ओळखले.. मी कवी..

**बबन :** तू नाही.. ती कवी..

**अनिरूद्ध :** मराठीचा खून पाडू नकोस. व्याकरणाचे नियम काही असतात की नाही? कवयित्री म्हण..

**बबन :** गैरसमज.. गैरोंको होनेवाला समज..

**अनिरूद्ध :** मी नाही समजलो..

**बबन :** कविराज.. ती नावाची कवी.. आय मीन आडनावाची कवी.. तुला ती कवी कवयित्री दिसली कारण.. जे न देखे कवी ते देखे.. चुकलो.. जे न देखे रवी.. कविता कवी..

**अनिरूद्ध :** ओह ! म्हणजे ती मला कवी नाहीच म्हणाली? नसेल.. पण आननी तीही कवीच असणार..

**बबन :** यू मीन.. कवयित्री.. तू छाननी बरी केलीस लगेच.. आननी दिसताच..

**अनिरूद्ध :** हो..

**बबन :** म्हणजे ही वहिनी नाहीच.. ?

**अनिरूद्ध :** ना.. ही.. रे..

**बबन :** हूं... देवा.. बच गया !

***

## प्रवेश दुसरा

अनिरूद्ध आणि बबन दोघे स्तब्ध.. स्वप्न पहावे तसे. दिवास्वप्नांत रंगलेले दोघे.

प्रकाश ए वर पडतो. त्यात तो आणि कविता.. बी मागे पुतळ्यासारखा उभा आहे.

**अनिरूद्ध :** कशी आहेस? कविता.. सॉरी हां... नावाचा गोंधळ..

**कविता :** छे हो.. तुम्ही कशाला सॉरी.. माझीच चूक..

**अनिरूद्ध :** तुम्ही? .. अहो जाहो कशाला.. म्हणजे..

**कविता :** ओके.. तुम्हाला.. तुला.. कविराज म्हणू?

**अनिरूद्ध :** वा.. वा! किती मृदू नि मुलायम, तलम नि नितळ, गोड नि मधुर आवाज.. त्या आवाजात.. कविराज.. ऐकत रहावेसे वाटते..

**कविता :** थ्यांक्यू..

**अनिरूद्ध :** तू नि मी.. रोज सकाळी.. एकमेकांना कविता ऐकवू.. मी टोपण नाव घेऊ का?

**कविता :** आम्ही नाही जा.. टोपण कशाला.. आणि मी नावाचीच.. कवी.

**अनिरूद्ध :** छे गं.. तू मूर्तिमंत कविता.. काव्य.. मी कवितापती.. वा.. ! कवि कवितापती.. मी मग सगळी कविसंमेलने गाजवीन.. त्या टाळ्या मला

आताही ऐकू येताहेत.. तू माझी प्रेरणा.. स्फूर्ती.. चेतना.. करूणा.. कल्पना..

**कविता :** माझी एक.. याचना.. किती रे सुंदर बोलतोस तू.. ऐकत रहावेसे वाटते रे..

**अनिरूद्ध :** खरंच.. परत बोल ना..

**कविता :** आम्ही नाही.. जा..

प्रकाश सरकून बबन  आणि कविता वर. अनिरूद्ध मागे थिजल्यासारखा उभा..

**बबन :** कशी आहेस?

**कविता :** तू? बरे झाले भेटलास..

**बबन :** मला वाटलेच तू भेटशील.. सच्चा प्यार.. सच्चे दिलसे मांगो.. तो सारी काय ती.. कायनात.. तुमको उसे मिला देती है..

**कविता :** खरेय.. तू म्हणतोस ते.. खरेखुरे.. सच्चे.. तो तुझा मित्र..

**बबन :** ए? छड्ड यार.. खरे सांगू.. नावाचा.. कवी.. म्हणजे तुझ्यासारखा आडनावाचा नाही.. बाल ब्रह्मचारी.. शुकासारखा..

**कविता :** हुं... पण माला.. हैना.. तोच.. तूच .. हैना..

**बबन :** बोल बोल प्रिये.. तुझ्या आवाजातले नाद माधुर्य तो गोडवा.. कानात भरून ठेवावासा वाटतो.. गं

**कविता :** बरणीत लोणचे भरावे तसा?

**बबन :** किती सुरेख.. बोलतेस गं.. बोल ना.. तू हैना.. बोल.. अडखळू नकोस..

**कविता :** छे.. आम्ही नाही जा..

(कविता नाहीशी होते. अनिरूद्ध आणि बबन  परत नॉर्मलवर)

**बबन :** काय कविराज.. खयालोंमें.. कहां खो गये?

**अनिरूद्ध :** खो गया.. सो गया.. स्वप्न म्हणू की सत्य..

**बबन :** खरंच.. स्वप्न म्हणू की सत्य.. कविता..

**अनिरूद्ध :** कोण कविता.. वो कवी.. कविता.. ?

**बबन :** विसरू नकोस.. (हनुमानाकडे बोट दाखवत.. ) तू बाल ब्रह्मचारी..

**अनिरूद्ध :** बालपण गेले लया.. तारूण्या आले उदया.. कवितेच्या नादाने.. नाद म्हणजे.. आवाज.. बरे.. मन माझे लीलया..

**बबन :** कविराज.. शी हेट्स कवी आणि कविता..

**अनिरूद्ध :** शी हेट्स कविता? म्हणजे हरसेल्फ? स्वत:च स्वत:ला हेटते? द्वेष? मत्सर? ओके.. मी तिला समजावेन.. राणी माझी.. उगी उगी..

**बबन :** पण ती वहिनी नाही.. म्हणालास..

**अनिरूद्ध :** ते त्या.. क्षणापर्यंत.. आता मी अंतर्बाह्य बदललोय..

**बबन :** आधी ती जीन्स बदल.. (नाकावर बोट दाबत) सहा महिन्यांत धुतलेली नाहिस..

**अनिरूद्ध :** चुप... प्रेमी जीवांवर असल्याच जालिम जमान्याच्या कमेंट्स.. कुत्सित.. ती मूर्तिमंत कविता..

**बबन :** म्हणजे काय.. एका म्यानात दोन तलवारी.. की दोन म्यानात एक तलवार.. कन्फ्यूझिंग.. गोंधळ

**अनिरूद्ध :** तू विचार नको करूस.. आधी म्हणालास ना वहिनी.. तेच खरे.. नि तेच बरे..

***

# प्रवेश तिसरा

(उघड्या दरवाज्यातून कविता धावत धावत आत येते.. धापा टाकत.. )

**कविता :** (बबन  कडे पाहात)अय्या.. बरे भेटलास.. (अनिरूद्ध कडे लक्ष जाते) तुम्ही..

**अनिरूद्ध :** कोण.. कविता.. खरी खुरी.. चिमटा घेऊन पाहतो..

**बबन :** ए त्यांना चिमटा काढतोस? काय हे.. शोभत नाय..

**अनिरूद्ध :** नाही.. स्वत:लाच काढून पाहतो.. चिमटा.. हे स्वप्न की सत्य..

**बबन :** त्याच्याकडे नका लक्ष देऊ.. हा थोडा हा.. आहे.. ढिला स्क्रू.. कवी आहे म्हणजे समजले असेलच.. (जीभ चावतो).. कवी म्हणजे तुमच्यासारखे नाही.. हा पोएट.. पोयेट..

**अनिरूद्ध :** कसे काय येणे केलेत? तातडीने.. ? फोन केला असता तर मी नसतो का आलो?

**बबन :** आधी अंघोळ कर.. जायचेय तुला.. उशीर होईल..

**कविता :** फोन कसली करतेय? मी किनई माझा मोबाईल विसरली.. अय्या.. आणि ते सोनेरी पेन पण.. माझ्या बाबानी दिलेले.. ते घ्यायला आली.. अय्या.. कुठेय?

**अनिरूद्ध :** किती छान अय्या.. माझा पहिला अय्या..

**बबन :** त्यांना उशीर होतोय.. मोबाईल कसा तुमचा.. दिसतोय का पहा.. आणि ते सोनेरी पेन..

**कविता :** इथेच विसरली मी.. इथेच ठेवली.. पहा ना

**अनिरूद्ध :** नाही हो.. तुम्ही तो फोन घेतला ना.. रवि नाही कवी म्हणत.. मग टाकला तो ब्यागेत.. माझे लक्ष होते.. तुमच्याकडे.. च.. नि पेन काढलेच नाही तर..

**कविता :** अय्या.. खरंच.. ( खोटे रडायला लागते) बाबा.. माझे पेन..

**अनिरूद्ध :** तुम्ही नका रडू.. मी तुम्हाला छप्पन पेनं आणून देईन. सोनेरी..

**कविता :** (रडत) नाही.. तेच.. बाबांनी दिलेले.. सोनेरी..

**बबन :** रडू नको.. नका.. हा ते शोधेल.. रस्त्यात कुठे पडले असणार.. ते पेन..

**अनिरूद्ध :** कुठपर्यंत गेला होतात तुम्ही.. ?

**कविता :** (डोळे पुसत.. लगेच टोन बदलत) नाक्यापर्यंत.. त्या तिथे..

**अनिरूद्ध :** कुठेही असो.. आकाश पाताळ एक करीन.. पण तुमचा तो भ्रमणध्वनी नि झरणी.. आणीन.. नाहीतर नाव लावणार नाही.. कविता.. पती.. (जीभ चावतो)

(घाईघाईत निघून जातो, दरवाजा बंद करून धाडकन)

**बबन :** हूं... गेला एकदाचा.. कविता..

**कविता :** काय शोनुल्या.. हा गेलाच नाही सकाळी.. याला काढण्यासाठी किती उचापती..

**बबन :** हूं.. माझा पती उचापती.. नाही माझी पत्नी उचापती.. पण कुठे हरवलास मोबाईल.. ?

**कविता :** छे रे... हरवतेय कुठे.. (बॅगेतून काढत) हा बघ.. बंद पडलाय.. मेला.. ते त्याला घालवायला.. माझ्या राज्जा.. नि ते पेन काय.. हरवायला काय जातेय..

**बबन :** म्हणजे तो आलेला फोन ही खोटा.. बंद फोन वर आला की काय तुला तो.. ?

**कविता :** हा.. हा..

**बबन :** तू खरंच किती हुशार आहेस..

**कविता :** हं.. पण तितकीशी नाही.. तुझ्यापेक्षा तो अनिरूद्ध बघ, गेला ना पेन शोधायला.. हाऊ स्वीट.. नाहीतर तू..

**बबन :** स्वीट..? जन्मभर ऐकत बसशील.. गोडगोड कविता. बासुंदी सारख्या.. पण तुझी आयडिया ग्रेट.. आता हा यायला किती वेळ लागेल..

**कविता :** कितीही लागो.. ह्याप्पी बर्थ डे शोन्या..

**बबन :** थ्यांक्यू.. माझी हुश्शार.. यू डिझर्व दिस.. जादू की झप्पी ! ( दोन्ही हात पुढे करून तिला कवेत घ्यायला जातो)

**कविता :** (मागे सरत) आम्ही नाही जा..

# अंक दुसरा

## प्रवेश पहिला

घडाळ्यात साडे अकरा झालेले.. दोन तास उलटून गेले आहेत.. अनिरूद्ध परत येतो.. चेहरा पडलेला.. हात रिकामे.. ना मोबाईल ना पेन हातात..

इकडे कविता निघून गेलेली. बबन पाय पसरून साळसूदपणे बसलाय.

**बबन :** ये, ये अनिरूद्ध. काय पूर्ण झाला.. तुझा पण.. प्रण.. प्राण जाए पर वचन न जाए..

**अनिरूद्ध :** झाला.. असता.. पण.. कविता कुठेय?

**बबन :** ती? ... त्या.. ? गेल्या.. थांबून,,कंटाळून.. बिचा-या.. किती अश्रूपात.. डिहायड्रेट झाल्या असाव्यात..

( समोर चहाचे कप, रिकामे ग्लासेस नि थाळया.. काहीतरी खाल्लेले असावे असे लक्षात येते.. ते पाहात.. )

**अनिरूद्ध :** तरीच जलपान.. वा.. ! तिला तू चहा पाजून.. खाऊ घालून.. स्त्री दाक्षिण्य दाखवलेस.. आणि मी.. रस्ते तुडवीत फिरलो..

**बबन :** थोडे तो पापड बेलने पडेंगे ना यार.. काही मिळवण्यासाठी काही गमवावे लागतेच.. खलील जिब्रान सांगून गेलाय..

**अनिरूद्ध :** कोण? कोणाला? तुला? कधी? कानात सांगितले की काय?

**बबन :** हे बघ.. कोणी का सांगेना.. जिब्रान नसेल तर ॲरिस्टॉटल असेल, नायतर प्लूटो.. पण खरंय की नाही? हे महत्त्वाचे.. पेन सापडलेना? कुठेय? नि मोबाईल?

**अनिरूद्ध :** हूं... जंग जंग पछाडले..

**बबन :** आकाश पाताळ एक केले..

**अनिरूद्ध :** रस्त्यातील कचरा नि कचरा.. पेट्या पालथ्या घातल्या.. दोन तास घालवले..

**बबन :** मग झाली का पेन प्राप्ती?

**अनिरूद्ध :** बिच्चारी कविता.. तिचे पेन.. मोबाईल.. दुसरा आणता येईल.. पण तिचे ते मूल्यवान पेन..

**बबन :** मग.. आता नाव बदलतोयस? म्हणजे तूच बोलला होतास.. माझा तसा आग्रह नाही.. अ चा ज्ञ.. झाल्याने ध चा मा थोडीच होणारे.. म्हणजे काय फरक पडतो? तू तोच राहणारेस.. नि तुझी कविता.. आय मीन.. पोएट्री.. ती पण तीच राहणार..

**अनिरूद्ध :** कविता.. कोण.. कुठली.. कशासाठी.. कशी काय.. आली नि गेली.. परत कुठे भेटेल?

**बबन :** खरंय बाबा.. तू बदललास.. जीन्स न बदलताही.. बरेच झाले नाही बदललीस.. दुसरी पण खराब झाली असती.. त्या कचरा पेट्यांत.. दुसरी पॅंट.. आणि हे घडवणारी नायिका.. कुठे शोधशील? तिचा काही नंबर? कविराज?

**अनिरूद्ध :** गप्प आता.. नो डिस्कशन.. त्यापेक्षा त्या कवितेच्या नादी लागलो नसतो.. तर.. सकाळी निघून गेलो असतो तर.. हे सर्व घडलेच नसते.. ती कविता म्हणजे मी लिहीत होतो ती बरे.. माझी ती पेनवाली नाही.. तिची बिचारीची काय चूक?

**बबन :** घाव कुछ गहरे दिये हैं उसने.. हाय तोबा मच गई.. जब

**अनिरूद्ध :** गप्प.. शांतता.. शांती.. हवी मला.. न पेन न मोबाईल.. ना ही कविता.. ना ती कविता.. एक पेन.. सोनेरी.. जाऊ देत.. ( हनुमानाच्या तसबिरीस नमस्कार करत) पुनश्च जय हनुमान..

**बबन :** हूं.... सुटलो

**अनिरूद्ध :** काय म्हणालास?

**बबन :** काही नाही... तुला ओरिजिनल ब्रह्मचारी मोड मध्ये पाहून बरे वाटले. जे जमते तेच करावे माणसाने. उगाच नाद..

**अनिरूद्ध :** नाद? काय तो तिचा आवाज.. मला वाटते हा दैवी संकेत असावा..

**बबन :** दैवी? आणि संकेत? कचरा पेट्यांत?

**अनिरूद्ध :** पेट्या सोड त्या.. संकेतच.. होय.. विरह वेदना.. या दु:खातून जन्माला येईल एक सुंदर असे काव्य.. या वेदनेची चव कळावी म्हणून नियतीने

आखलेली ही योजना.. येस.. मी तिला शब्दांत मांडणार.. कवितेला कवितेच्या कोंदणात बसवणार..

एक अनामिक हूरहूर आणि

हृदयाची थरारे तार..

हाय विरहाग्नीतून वाजे..

असली दिडदा दिडदा

सतार..

**बबन :** तू जातोस.. की मी जाऊ.. अंघोळीस.. लावूनिया कतार?

**अनिरूद्ध :** पाप.. कुठे फेडशील.. एका कवीच्या भाव भावनांचे विभ्रम आणि कल्लोळ काव्यात परिवर्तित होताना कुणी क्षूद्र जगाच्या नियमांची जाणीव करून देणारा तितकाच क्षूद्र असा जंतू तू.. कुठे फेडशील?

**बबन :** आसान किश्तोंमें.. इएमाय.. सिर्फ टिंब टिंब रूपये..

**अनिरूद्ध :** आज आता कडेलोट.. मी माझ्या कोशात.. काव्यकोशात स्वत:ला गुरफटून घेतोय.. सुरवंटासारखा.. असा कोश ज्यास तू भेदू शकणार नाहीस.. समज ही काव्य तटबंदी.. माझ्याभोवती मी विणतोय.. आतून उमटेल मग ते रेशमी काव्य.. कोश फोडून..

**बबन :** ठीके.. मी अंघोळीस जातोय.. माझा पैला नंबर.. बाय द वे आज गरम पाण्याला सुट्टी... टाटा

**अनिरूद्ध :** जा.. जहन्नुममधे जा... कविता..

**बबन :** ये बाथरूम ही है जन्नत और जहन्नुम हमारा यारों..

( निघून जातो )

**अनिरूद्ध :** (स्वगत) टू लिही ऑर नॉट्टू लिही दॅट्स नॉट द क्वेश्चन.. कविता.. पती..

जालीम जमानेकी रीत..

न जाने मेरी प्रीत..

*खाली मान घालून लिहीत बसतो. पेपरावर लिहीतो, वाचतो.. फाडून टाकतो..*

*हळूहळू अंधार पसरतो..*

***

## प्रवेश दुसरा

*दिवस दुसरा.. अनिरूद्ध उठतो.. कॅलेंडरवरची तारीख बदलतो. तिथून बाथरूममध्ये.. मग दरवाजावरचा पेपर काढतो.. दार उघडेच.. पेपरातील हेड लाईन वाचतो, एक कवीच्या कवितांची चोरी.. धाडसी दरोड्यात दहा काव्य संग्रह लुटले.. पेपर बाजूस ठेऊन टेबल खुर्चीवर बसून पेन हातात.. लिहीत बसतो.. खाली मुंडी.. हळूच पण ऐकू येणा-या आवाजात दोन ओळी म्हणतो, लिहीता लिहीता..*

पाहतो गं वाट सखी..

काळजाच्या कोनातूनी..

ऐकू येई का नाद तुला..

तुझिया.. कानातूनी.. नाही.. कर्णातूनी.. नाही..

*( कवितेशी झटापट चालू असतानाच.. उघड्या दारातून एक मुलगी थेट आत शिरते.. सेम कवितेसारखी पण मॉडर्न वेशात.. टी शर्ट.. जीन्स.. बोलण्यात इंग्लिश टोन.. हातात हायफाय मोबाईल.. अनिरूद्ध समोर उभी राहते.. )*

**मुलगी :** हॅलो.. हाऊ आर यू?

**अनिरूद्ध :** कविता? हे सत्य की भास.. आभास.. कविता तू? आणि इतकी बदललीस? एक दिवसात?

**मुलगी :** कोण कविता? कविता? कोण?

**अनिरूद्ध :** मला सगळीकडे कविताच दिसते.. की काय? तू.. तुम्ही काल आलेल्या कविता... च ना?

**मुलगी :** नो नो नो नो.. मी आताच आलेय.. मी सविता.. सविता रवी..

**अनिरूद्ध :** रवी?

**मुलगी :** यस.. रवी माझे सरनेम.. मायसेल्फ मिस सविता रवी..

**अनिरूद्ध :** खरं सांगू.. काल डिट्टो तुमच्यासारखी आली होती मुलगी.. कविता.. कवी..

**सविता :** व्हॉट ए को इन्सिडन्स.. रवी.. कवी.. सविता.. कविता..

**अनिरूद्ध :** का हॊ.. कही तुम वो मेले मे गुम हुई जुडवा बहन तो नही.. एक चोर.. एक पोलिस?

**सविता :** डोण्ट टेल मी.. मी तुम्हाला चोर वाटते.. की कालची चोर नि मी पोलिस?

**अनिरूद्ध :** नाही हो.. आपले हिंदी सिनेमाचे एक उदाहरण दिले..

**सविता :** पण तुमची ती ट्रीक चांगलीय.. मुलींना फसवण्याची.. (हनुमानाकडे बोट दाखवत) तुम्ही याचे भक्त..

**अनिरूद्ध :** होय.. परम.. आणि मी तुम्हाला फसवत नाहीये.. आणि येथे कशासाठी आल्या आहात तुम्ही? दरवाजातून थेट घुसलात.. लवकर सांगा.. मला बाहेर जायचंय.. तयारी करून..

**सविता :** (दचकल्यासारखी पण आनंदाने) हो? हो का? मी इथे का बरे आलीय?

**अनिरूद्ध :** तुम्हाला माहित नाही.. ?

**सविता :** हां.. आठवलं.. सर्वे करायला आलीय मी इथे..

**अनिरूद्ध :** अशा? आणि आता.. सकाळी सकाळी.. हातात ना पेन ना कागद.. बये.. म्हणालो असतो पण तुमचा अवतार बयेसारखा नाही ना.. कसला सर्वे?

**सविता :** एक साथ किती प्रश्न? काय सांगू.. सगळा एरिया कव्हर करायचा तर लवकर यावं लागतं.. एका घरापाठी तीन रूपये.. फीसाठी पैसे लागतात.. माझा कुलिग येतोय.. विथ ऑल पेपर्स.. सर्वे.. मग लकी ड्रॉ पण..

**अनिरूद्ध :** लकी ड्रॉ? माझे लकच.. फुटके.. काल दोन तास कचरा कुंड्या.. बाय द वे.. तुम्ही पेन बिन आणलंयत ना? नि मोबाईल नीट बॅगेत ठेवा..

**सविता :** हे पहा ( बॅगेतून सोनेरी पेन काढते) .. माय फादर गिफ्टेड.. फॉर माय बर्थडे.. यू नो.. माय लकी पेन..

**अनिरूद्ध :** काय सांगता.. व्हॉट ए कोइन्सिडन्स अगेन.. काल ती कविता आली ना.. तिचे पेन जे हरवले ते पण सोनेरी.. तिला ही तिच्या वडिलांनी दिलेले.. तेच काल हरवले..

**सविता :** ऒएमजी.. ! खरेच? (बेड कडे बघत) हे कोण हो झोपलेले?

**अनिरूद्ध :** माझा रूम पार्टनर.. बबन बोबडे.. ऊर्फ बबन .. झोपाळू नुसता.. तुम्हाला सांगू.. अजिबात राम नाही.. त्यात.. ते जाऊ द्यात तुम्ही कविता ऐकणार का? तुमचा कलिग येई पर्यंत..

**सविता :** कविता? ती तर कालची.. आज ही कुठली?

**अनिरूद्ध :** यू नो.. आय एम अ पोएट.. सो पोएट्री.. पोएम..

**सविता :** ओह.. तुम्ही म्हणालात तुम्हाला उशीर होईल.. गेटिंग लेट?

**अनिरूद्ध :** हो.. पण कविता कसे कुणी कान देऊन ऐकणारे भेटले की.. सार्थक.. त्यात आजच्या दिवसाची बोहोनी चांगली झाली..

**सविता :** क्काय? पण राहू देत.. कम ऑन.. पण एकच हां.. आणि मला समजेलशी.. ऍम फ्रॉम होनोलुलू.. नैरोबी.. माय मराठी वीक..

**अनिरूद्ध :** ओके.. सिंपल वन.. लेटेस्ट वन..

ऐक सखे तू

दिसलीस कशी मज

काल जशी ओझरती

भिजवून धरती जाई जणू

रिमझिम श्रावण सर ती..

आज तरी तुझ्याच दर्शना

अजुनी असला झुरतो

पण सांगू

गंध तो तव भेटीचा

अजूनी मजला पुरतो..

सय तुझीच येते

छळते

रात्रंदिन ती

सूर हृदयीचे परंतु असले

आर्त गीत ते गाती...

**सविता :** वा! पोएट.. क्या बात है..

**अनिरूद्ध :** वा! तुम्हाला आवडली म्हणजे धन्य.. वा.. आजचा दिवस छान जाणार.. क्या बात..

**सविता :** पण इस पांघरूण के कौन है आत?

**अनिरूद्ध :** अरे.. तुम्हालाही गुण लागला की..

**बबन :** (हळूच डोळे उघडत) अरे कोण आहे?

**अनिरूद्ध :** अरे उठ, तुझ्या ताई आल्यात.. सर्वे साठी

**बबन :** कोण सुर्वे? ताई सुर्वे? की माई सुर्वे?

**अनिरूद्ध :** उठ, आधी डोळे उघड.. सुर्वे नाही.. सर्व्हे..

*बबन उठून बसतो.. समोर कविता.. वेगळयाच वेशात पाहून गडबडतो..*

**सविता :** (फोन वर बोलत) हो.. ऍम वेटिंग.. हियर.. या.. या.. गेटींग लेट.. ओह.. ओके.. आय ऍम वेटिंग.. येस.. येस.. (ठेवते आणि अनिरूद्ध कडे पाहून) तुम्हाला उशीर होतोय.. मी जाऊ?

**अनिरूद्ध :** नो.. नो.. हा बबन आहे ना.. पण लकी ड्रॉ मध्ये मात्र माझे नाव.. अनिरूद्ध अडसूल.. विसरू नका..

**सविता :** ओह.. हो नक्की.. यू गो.. प्लीज.. नाही तर मला गिल्टी वाटेल.. माझ्यामुळे उशीर..

*अनिरूद्ध पडद्यामागे कपडे बदलतो. सविता बबन कडे पाहात उभी नि बबन तिच्याकडे पाहात उभा, बबन डोळे चोळतोय.. सविता त्याला हळूच डोळा मारते.. बबन मटकन बेडवर बसतो.. अनिरूद्ध बाहेर येत..*

**अनिरूद्ध :** ओके म्याम.. मी निघतो.. बबन .. त्यांचा फॉर्म.. भरून घे नीट.. लकी ड्रॉ.. मध्ये माझे नाव घाल.. नि नंबर.. त्यांचा कलिग येतोय.. फॉर्म घेऊन..

( जातो. सविता पाठोपाठ जाऊन दरवाजा लाऊन घेते हळूच.. बबन तिच्याकडे पाहातोय)

**सविता :** काय हे? किती वेळ उठायला? जाग येत नाही? माझी कविता पण ऐकून झाली..

**बबन :** जाग येते गं, पण जागा नाही होत मी.. नि कविता.. ? तूच आहेस ना?

**सविता :** काय शोनुल्या.. मी आली की नाही.. ऍंज प्रॉमिस्ड..

**बबन :** तू? मी तुला ओळखलेच नाही.. मॉड कविता..

**सविता :** नॉट कविता.. ऍम सविता.. नि मी बोलली ना उद्या परत येणार ती. आणि आज अनिरूद्ध आपोआप गेलाय..

**बबन :** सो.. मोकळे रान.. यू आर ग्रेट.. छान दिसतेस.. सीता और गीता..

**सविता :** नाही.. सविता और कविता..

**बबन :** ते काही असो.. यू डिझर्व जादू की झप्पी... डियर..

**सविता :** छ्छ.. पहले ब्रश करो गंदे बच्चे.. आणि.. आम्ही नाही.. जा..

( हळू हळू अंधार)

***

## प्रवेश तिसरा

वेळ दुपारची.. कविता परत गेलीय.. बबन  बसलाय खुर्चीत.. एकाएकी त्याच्या लक्षात येते.. टेबलावरच्या कपबशा नि ताटल्या उचलतो. त्या धुतल्याचा आवाज.. मनाशीच म्हणतो.. हा जय हनुमान येण्याआधी लक्षात आले म्हणून ठीक.. सुटलो.. आता पुरावा नाही.. कविते..

स्टोल माय हार्ट.. यू आर अ चोर.. चोर.. चोर.. चोर..

**अनिरूद्ध :** (आत येत) चोर? माझ्या कविता तर नाही ना चोरल्या?

**बबन :** का? रद्दीत विकण्यासाठी? .. अडला हरी.. अनिरूद्ध च्या कविता चोरी? झाले काव्य संमेलन?

**अनिरूद्ध :** होय.. त्या टाळ्या.. वन्स मोअर.. ती धुंदी.. ती नशा..

**बबन :** आणि श्रोत्यांची.. दशा..

**अनिरूद्ध :** ते जाऊ देत.. गेली ती सविता?

**बबन :** कोण? कविता.. हां.. सविता.. गेली..

**अनिरूद्ध :** भरला फॉर्म? लकी ड्रॉ..

**बबन :** कसला फॉर्म?  हा... तो.. तो फॉर्म.. भरला... सो लकी.. विसरलोच होतो मी..

**अनिरूद्ध :** किती योगायोग.. ही त्या कविता कवी सारखी.. नाव सविता रवी.. हिच्याकडेही ते सोनेरी पेन.. बापसाने दिलेले.. किती चमत्कार..

**बबन :** हां.. चमत्कार.. पण मला हे सगळे लक्षात नाही आले.. काल पासून तुझी नजर बदलली.. मुलींकडे लक्ष देऊन बघायला लागलायस.. पण कॉन्ग्रॅट्स.. जीन्स बदललीस.. अंतर्बाह्य बदल..

**अनिरूद्ध :** नीट बघायला कशाला हवंय.. हुबेहूब कविता..

**बबन :** तुला जिथे तिथे कविता दिसते.. ब्रेनची सर्विस करून घे.. जळमटे झाली असणार.. एनी वे.. चाप्टर क्लोझ्ड..

**अनिरूद्ध :** छान.. या योगायोगावर काही लिहीता येईल.. एक कथा काव्य किंवा काव्य कथा.. पुढील महिन्यात बुरजेवाडीच्या संमेलनात वाचण्यासाठी..

ताज्या आहेत भावना

तोवर पेरून टाका..

कवितेची बीजे..

**बबन :** या कविराजास.. अजून न सुचे दुजे..

***

# प्रवेश चौथा

सकाळची वेळ. अनिरूद्ध उठलेला. सकाळची तयारी चाललीये. बाथरूममधून जा ये चालली आहे. दरवाजावरचा पेपर काढतो..

**अनिरूद्ध :** ( स्वत:शीच मुक्त छंदातल्या कवितेसारखा बोलतो )

आज नाही काही चोरीची बातमी... नो कविता.. नो सविता..

त्या कवितेस मी कधीच मनातून काढून टाकलंय मी.. या कवितेसाठी..

मागे सोनेरी केस वाली परी असायची.. ही सोनेरी पेन वाली.. एकासारखी एक.. सविता.. कविता..

हिला झाका तिला काढा.. च्यायला.. कोइन्सिड्न्स?

असला?

हा योगायोग की.. प्रयोग?

माझ्यावर प्रयोग? म्हणजे दोघीही.. एकच?

की आज येणार कुणी.. बबिता बबी.. संगीता सवी..

डाळीत जरूर काही काळे आहे.. काळेबेरे.. सालवाली मुगाची डाळ? छिलटी म्हणतात ती?

कान्ट डायजेस्ट.. एका सारख्या एक दोघी?

एका पाठोपाठ एक दिवशी.. काहीतरी काम काढून..

परवा याचा वाढदिवस..

सोनेरी पेन.. रस्त्यावरचे पेन कधी सापडेल का?

पहिला ऐकला अय्या नि चार आसू..

निघाले कचरा कुंड्या पाहायला..

आणि काल तो लकी ड्रॉ.. लकी.. नक्की कोण? मी की बबन .. ?

थिंक... कोइन्सिडन्स.. योगायोग..

दोन पोरी.. सेम टू सेम..

दोन्ही वेळी.. मी आऊट..

येस.. देअर आय गेट इट.. ही बबन  ची खोडी.. की त्याची जीएफ? कविता?

येस.. मी कबाबमें हड्डी?

मी बाहेर.. मग यांनी बनवला असेल का हराभरा शाही कबाब?

विदाऊट हड्डी?

दो और दो चार.. यू कांट फूल मी..

डिटेक्टिव अनिरूद्ध.. हुं...

स्वत:शीच मी बोलतोय.. स्वगत? जुन्या नाटकात असायची तशी..

मी आहे अनिरूद्ध.. मी आहे कविराज.. मी आहे काव्यसम्राट..

( बबन  कडे पाहात ) झोपलाय कुंभकर्ण.. ढाराढूर..

अरे तुझ्या सख्ख्या मित्राला शेंडी लावून तुला शांत झोप येते तरी कशी रे? पण काय पुरावा आहे? माझा नुसताच संशय.. की आहे परिस्थितीजन्य पुरावा..

कानून को सबूत चाहिये.. ये लातोंके बूत बातोंसे नहीं मानेंगे..

उठवू या बबन  ला.. विचारू जाब? लातोंका बूत.. की भूत?

( बबन  चा मोबाईल वाजतो.. बबन  झोपेत .. थोडा वेळ वाजल्यावर अनिरूद्ध उचलतो )

**अनिरूद्ध :** (फोन कडॆ पाहात) ( स्वत:शीच) के कॉलिंग? के म्हणजे कविता? ..

(फोनवर) हॅलो..

**पलिकडून आवाज** : शोनुल्या.. उठलास.. नाही बोललास तरी चालेल.. माझे ऎक.. मला ठाऊके.. तुला जाग आली तरी जागा व्हायला वेळ लागतो तुला.. पण आता उठ.. मी बोलते ते ऎक.. दोन दिवस मी आली.. आज तुझी पाळी.. नि कधी येतोस? नाही आमच्या होस्टेलात बॉइस आर नॉट अलाऊड.. तुला माझ्याहूनही मोठा जुगाड करावा लागेल.. यू प्रॉमिस्ड.. काल म्हणालास ना.. येतोस.. रूममध्ये.. दोन दिवस मी अनिरूद्ध ला मॅनेज केलेय.. आज माझी रूम पार्टनर.. तिला मी हाकलवते.. तू फक्त पोहोच.. लवकर हां.. राजा.. जागा हो.. दिवस वै-याचा आहे.. अनिरूद्ध

भय्याला नमस्कार नि सॉरी.. वाट पाहाते.. प्लॅनची लावू नकोस.. वाट.. बाय.. ठेवते..

**अनिरूद्ध :** ( फोन हळूच ठेऊन देतो ) (हलक्या आवाजात) च्यायला.. म्हणजे माझा संशय खरा ठरला.. हा नि कविता.. सविता.. मी तिला कधीच आऊट ऑफ माइंड केलेय.. पण बेट्यांनो.. हमने भी कच्ची गोलियां नही खेली.. असेच काहीतरी म्हणतात ते हिंदी सिनेमात..

**बबन :** (जागा होत) फोन.. माझा.. (बघतो).. नो मिस्ड कॉल.. ए किती वाजलेत?

**अनिरूद्ध :** झोप बालका.. झोप.. तुझी ती निद्रा.. शांत निरागस मुद्रा.. लागोपाठ दोन दिवस त्या मुलीने त्रास दिला तुला..

**बबन :** मुलीने नाही.. मुलींनी.. व्याकरण महत्त्वाचे..

**अनिरूद्ध :** खरंय.. आज झोप.. आणि श्रमपरिहारार्थ.. आज तुला माझ्याकडून पार्टी.. सकाळी दहा ते दोन.. मी तुझ्याबरोबर.. जो चाहिए मिलेगा.. मुव्ही.. खाना.. मुर्ग मसल्लम.. तंगडी कबाब.. आईस्क्रीम.. सब फ्री.. मी पैसे देणार.. उठ.. आज जाऊ..

**बबन :** ( झोपेचे सोंग घेत ) हां.. हां.. नाही.. हो..

**अनिरूद्ध :** नाही आणि हो? तू जागृत की निद्रिस्त.. ज्वालामुखी? की मेलास?

**बबन :** वाजले किती?

**अनिरूद्ध :** साडेदहा..

**बबन :** (ताडकन उठत) साडे दहा?

**अनिरूद्ध :** का? कुठली अपॉइंटमेंट? म्हणजे कॉलेजला सुट्टी... तुला महत्त्वाची गाठभेट..

**बबन :** छे.. आपल्याला कसले काम? पण वेळेवर सगळे झाले की बरे.. दिवस कसा फ्रेश.. (घड्याळाकडे पाहात) साल्या फक्त साडे नऊ झालेत.. नि मला खोटे सांगतोस?

**अनिरूद्ध :** मग काय? आता नाहीत तर एक तासानी होतील.. साडे दहा.. माय ग्यारंटी.. उठ चल.. आज माझी ट्रीट.. पार्टी.. खाएंगे, पिएंगे ऐश करेंगे.. दरबार दिल्ली.. भरणार बिल.. मी..

**बबन :** (खोट्या उत्साहात) वा.. राजा उदार झाला.. सूर्य आज उत्तरेस उगवला.. पण माझा तुझ्यावर नाही भरवसा.. बिल नाही भरलेस तर मला बसवशील तिकडे दिल्ली दरबारी भांडी घासवत.. नो.. नाय.. नेव्हर..

**अनिरूद्ध :** प्रॉमिस यार.. ऐसा मौका फिर कहां मिलेगा..

**बबन :** ओके.. तू म्हणतोस तर.. पण एक अट.. मी आधी तयार होणार.. तुझ्या.. तेही आताच.. तू नंतर..

**अनिरूद्ध :** वा! काय अट आहे! का? का असे?

**बबन :** नो क्वेश्चन्स... ओन्ली आन्सर्स.. अट मंजूर.. ?

**अनिरूद्ध :** ओके.. नो प्रॉब्लेम

*( बबन  पटकन बाथरूम मधे शिरतो )*

*अनिरूद्ध टेबलापाशी गालातल्या गालात हसत बसतो. लिहीतो.. मग बाथरूमकडे पाहात गाऊ लागतो..*

**अनिरूद्ध :** माझ्या ह्या होस्टेलच्या पाशी..

थांब तू गडे जराशी..

चोरून लपून भेटायचे..

झोपाळयावाचून झुलायचे..

*( थोड्यावेळात बबन  बाहेर येतो. अनिरूद्ध हळू हळू तेच परत गातोय.. बबन  त्याच्या कडे दुर्लक्ष करत )*

**बबन :** जा तू.. मी तोवर वाट पाहातोय.. नीट अंघोळ कर.. किती मळलायस बघ..

**अनिरूद्ध :** ओके बाबा.. आय ऍम द मॅन हू नोज फ्यूचर..

( आतून गाण्याचा आवाज : मैं तुझसे मिलने आई मंदीर जानेके बहाने.. मैं तुझसे मिलने आई.. )

( काही क्षण अंधार.. परत उजेड.. अनिरूद्ध बाहेर येतो. बबन  निघून गेलाय)

**अनिरूद्ध :** बबन .. कुठायस तू? .. वाटलेच मला.. हा पळून जाणार.. आग्र्याहून सुटका.. बिन पेटा-याची.. तशी होस्टेलातून सुटका.. लव्ह बर्डस.. हाऊ विल ही मॅनेज गर्ल्स होस्टेल? काही म्हणा.. प्रेमातुरांणां.. न भयं न लज्जा.. मी आपला माझ्या .. ओरिजिनल कवितेकडे वळतो.. शादी किसीकी हो.. अपना दिल गाता है..

*(लिहीता लिहीता वाचतो)*

कोन्यात लाजरी ती

झंकारते सतार

आले कशी न पूस तू

सोडून लाज

सांगे ती तार

येतोच चांदणी मी

हा चंद्र का म्हणाला

मनी चांदणीच्या असली

हुरहूर लावण्या गेला..

*(टेबलापाशी लिहिता लिहिता उजेड हळू हळू मंदावतो)*

..............................................................................

# अंक तिसरा

*घड्याळात वेळ दोन तासांनंतरची. बबन  परत येतोय. हात बॅंडेजमध्ये. डोक्याला बॅंडेज.. हिंदी सिनेमात असते तसे.. मध्ये एक लाल डाग.. बरोबर कविता.. नेहमीच्या ड्रेसमध्ये... त्याला पकडत पकडत येते.. बबन  लंगडत येतोय..*

**अनिरूद्ध :** यावे.. यावे सरदार.. आमची पार्टी सोडलीत.. ( त्याच्या लंगडण्याकडे पहात) याहून वेगळे काय होणार होते?

**कविता :** नाही हो..

**अनिरूद्ध :** सापडला का तुमचा.. मोबाईल नि बाबांचे ते पेन?

**कविता :** हा पहा.. सॉरी..

**बबन :** आई गं... दुखतोय पाय..

**कविता :** थांब.. तू झोप.. जरा हात देता का?

*( अनिरूद्ध पकडतो.. दोघे बबन  ला झोपवतात )*

**कविता :** फार दुखतंय का?

**बबन :** हुं.. जरा पडतो मी.. इथे..

**कविता :** मी जाऊ?

**अनिरूद्ध :** नको हो.. थोडे थांबा.. म्हणजे याला बरे वाटेल.. नाहीतर मला वाटेल एक कुरियरवाला आला पार्सल घेऊन

**कविता :** म्हणजे?

**अनिरूद्ध :** पार्सल दिले पत्त्यावर नि चालले परत..

**कविता :** ओके.. सॉरी.. थांबते

**अनिरूद्ध :** पण काय झाले सांगाल का?

**कविता :** सॉरी.. सॉरी.. मला हा बोलला.. तुम्हाला सगळे समजलेय.. क्षमस्व..

**अनिरूद्ध :** जाऊ द्या हो.. हे वयच असे असते.. मी असं बोलतोय जणू माझे उलटून गेलंय.. वय ! पण जय हनुमान !

**कविता :** होप.. तुमचा राग निवळला असेल

**अनिरूद्ध :** हो.. मी ते सगळं विसरलोय म्हणा ना.. माझ्या मेमरीकार्डातून डिलीट..

**कविता :** प्रॉमिस.. ?

**अनिरूद्ध :** यस्स.. मी म्हणालो ना.. शादी किसी की भी हो.. अपना दिल गाता है..

**कविता :** शादी नाही हो.. अजून.. वेळ आहे.. आमच्या घरचे... जाऊ दे ते.. वेगळेच प्रकरण आहे.. कठीण..

**अनिरूद्ध :** तुम्हाला सांगू का.. सगळ्या कठीण गोष्टींवर एक उपाय.. कविता..

**कविता :** काय?

**अनिरूद्ध :** कविता.. कविता करणे.. हाच उपाय.. आपले सुखदु:ख, भावभावना.. वेदनेचे हुंकार.. काव्य नि कवितेच्या कोंदणाची महिरप लावून बसवलीत ना की बघा.. त्या भावना बाहेर पडण्यास जणू वाट मिळते.. आणि..

**कविता :** पण ते प्रतिभावंतांचे काम.. आम्हाला काय जमणार? एका सामान्य मुलीस..

**अनिरूद्ध :** सामान्य? पण ते जाऊ द्या.. मी सांगतो काय झाले असणार?

**कविता :** कुठे?

**अनिरूद्ध :** कुठे काय? तुमच्या लेडिज होस्टेलात.. लेडीज होस्टेलवर..

**कविता :** लेडीज होस्टेलवर.. ?

**अनिरूद्ध :** हे पहा... तो तुमचा सकाळचा फोन..

**कविता :** ( मोबाईल दाखवत ) हा.. ?

**अनिरूद्ध :** नाही.. तुम्ही याला केलात ना तो फोन.. तो मीच घेतला होता.. बबन झोपलेला तेव्हा.. ढाराढूर.. तर मला प्रत्यक्ष हॉर्सेस माउथ.. घोडीच्या .. सॉरी.. तोंडून ऐकायला मिळाले सगळे.. सवि.. कविता..

**कविता :** सॉरी

**अनिरूद्ध :** कितीवेळा सॉरी म्हणणार.. आजच्या दिवसातील एकदम म्हणून टाका

**कविता :** सॉरी.. ओके सॉरी..

**अनिरूद्ध :** सो द स्टोरी.. मी कल्पना करू शकतो.. तिकडे काय झाले असेल.. हा आला.. बहुधा बुरखा घालून आला असणार.. यांच्या कपाटात मला वाटते

मी पाहिलाय काळा कपडा.. आणि हा काही सराईत चोर नाही.. शिरला असणार दबकत दबकत.. चोरी चुपके.. पकडला बाकीच्या पोरींनी.. हाणले दोन चार गुद्दे.. तितक्यात याचा बुरखा फाटला.. मुलगा बघून पोरी चेकाळल्या.. धू धू धुतला याला.. बिचारा..

**कविता :** अगदी बरोबर.. तुम्हाला आधीचा अनुभव आहे का हो?

**अनिरूद्ध :** मला? मी जय हनुमान.. पण जे न देखे सविता रवि.. ते देखे कविता कवी..

**कविता :** असेच झाले हो.. मी इतकी स्मार्ट.. समजते स्वत:ला.. काही नाही करू शकते.. हिंदी सिनेमा असता तर गाणे म्हटले असते.. हुस्न हाजिर है मोहब्बतकी सजा पाने को.. कोई पत्थरसे ना मारे.. मेरे दीवाने को..

**अनिरूद्ध :** आवाज खरेच छान आहे हो तुमचा.. दोन तासात किती रामायण घडले नाही.. पण हा बबन  तुम्हाला भेटला कुठे? मी काही तुझा.. तुमचा.. गार्डियन नाही.. नाहीतर विचारले असते.. दुसरा कोणी नाही भेटला का तुला.. तुम्हाला..

**कविता :** काय उत्तर देऊ?

**अनिरूद्ध :** म्हणजे नवी काही स्टोरी बनवायचा विचार?

**कविता :** ओह... ! म्हणजे तुम्ही अजून नाही विसरलात.. ती गोष्ट..

**अनिरूद्ध :** आता मी सॉरी.. पण खरे सांगू.. ते फुटपाथवर भटकण्याचे क्षण.. तो कचरा.. त्या कचरा पेट्या.. माझी अजून मळलेली ती जिन्स.. सारे कसे स्वप्नवत.. हनुमानभक्ताला अशी स्वप्ने पडत असतील का हो?

**कविता :** हुं... बरे आज तुमचे काही संमेलन नाही ना?

**अनिरूद्ध :** नाही हो..

**कविता :** नाही? आय मीन.. मला वाटले तुमची नवीन कोरी करकरीत कविता तयार असेल.. आज

**अनिरूद्ध :** तशी कविता तयार आहे.. पण.. नाही ऑफिशियल संमेलन नाही.. पण आता आहे आमचा.. काव्य कट्टा..

**कविता :** काव्य कट्टा?

**अनिरूद्ध :** येस.. तिथे आम्ही समविचारी.. आम्ही यांना कवितेचे आचारी म्हणतो.. आचारी म्हणजे.. आचारविचारात कविता आणि स्वयंपाक्यासारखी शिजवत घालतो ती ही कविता.. कवितेचे व्यामिश्र रूप.. त्यातील नाद नि ताल नि लय.. नवकवितेतील उद्दाम बंडखोरपणा.. कालिदासापासूनच्या उज्ज्वल परंपरेचे आम्ही पाईक.. मिळून अवलोकन.. समीक्षण.. नि..

**कविता :** बाप रे! खूप काही करता.. म्हणजे ट्रेनिंग कॅंप म्हणा की..

**अनिरूद्ध :** हं.. तुम्हाला लगेच कळले.. हा बबन  आहे ना.. बी फॉर बुद्धू.. अरे याला काही सांगितले की चेष्टा नि थट्टा करत असतो.. मला..

**कविता :** जाऊ द्या हो.. पण मनाने वाईट नाही.. तुमच्याबद्दल मला सांगत असतो.. तुमच्या कवितेचे त्याला फार कौतुक..

**अनिरूद्ध :** याला?

**कविता :** अर्थात.. पण असतो एकेकाचा स्वभाव.. कधी आहे तुमचा कट्टा?

**अनिरूद्ध :** येताय तुम्ही?

**कविता :** आले असते..

**बबन :** आई गं... दुखतंय..

**कविता :** याला जाग आली..

**अनिरूद्ध :** खूप दुखतंय कारे? नाहीतर मी कॅन्सल करतो जायचे..

**बबन :** नाही नाही.. आमच्यामुळे तुला आधीच त्रास झालाय.. तो अजून नको.. तू जा, कविता.. कविता आहे ना.. आहेस ना? की तू पण जातेस?

**कविता :** नाही रे.. नंतर कधीतरी.. (अनिरूद्ध कडे पाहात) तुम्ही प्लीज जा.. नाहीतर मला गिल्टी वाटेल..

**अनिरूद्ध :** खरेच की ते दोन दिवसांआधी सारखे? सॉरी.. सॉरी.. आय हॅव फरगॉट्न.. मी निघतो.. लवकरच

**कविता :** ठीक.. मी बसते इथेच.. याला बरे वाटे पर्यंत..

**अनिरूद्ध :** नाहीतर मी आताच निघतो.. माझी वाट पाहातोय कट्टा..

**कविता :** ठीक..

**अनिरूद्ध :** मी निघतोय रे.. यांना त्रास नको देऊस.. अजून धडपडू नकोस.. खरेच.. एखादे हाड मोडून घ्यायचास...

**बबन :** यस बॉस.. आई गं..

**अनिरूद्ध :** खूप दुखतंय का? चल हॉस्पिटलात जाऊ

**बबन :** नाही रे.. आणि आम्ही आताच तर तिथून आलोत ना? मी होईन ठीक.. तू जा..

**कविता :** मी आहे ना.. तुम्ही जा.

*( अनिरूद्ध जातो. हळूहळू अंधार, परत उजेड होतो. तेव्हा कविता नि तिच्या बाजूस बबन  बसलेला. त्याची बॅंडेजेस जागेवर पण असा बसलाय जसे ती नाहीतच. )*

**कविता :** काय कशी काय?

**बबन :** आयडिया की तब्येत?

**कविता :** दोन्ही.. पण हे जरा जास्तच होतंय.. म्हणजे मी तुला नाही म्हणत होते.

**बबन :** बस क्या.. त्याला फुटपाथ झाडायला लावताना कुठे गेला होता राधासुता.. सुते.. सुतीणी.. कन्ये तुझा धर्म.. एव्हरीथिंग इज फेअर इन वॉर ऍंड पीस.. ऍंड लव्ह..

**कविता :** चांगलाय रे बिचारा पण.. आता अजून नको.. हे शेवटचे.. अजून नको फसवाफसवी..

**बबन :** देखेंगे

**कविता :** म्हणजे? अजून काही?

**बबन :** खेळ तू सुरू केलास..

**कविता :** खेळ बिळ नाही रे.. आपले ठरलेले ना भेटायचे.. अनिरूद्ध बाहेर जाईल म्हणून.. आता तो गेलाच नाही तर.. म्हणून.. नि दुस-या दिवशी..

**बबन :** जाऊ दे.. आपण असा वेळ का वाया घालवतोय?

**कविता :** पण..

*(अनिरूद्ध एकाएकी आत शिरतो, त्याला बघून दोघेही चाट, बबन  पाय पसरून बसलेला तो दुखण्याचे बेअरिंग घेण्याचा प्रयत्न करतो.. अर्थात तो तसे करू शकत नाही.. कविता स्तब्ध उभी थिजल्यासारखी )*

**अनिरूद्ध :** अरे बबन ... डबल बी.. बस की नीट.. अर्ज किया है..

जख्म कितने दिये मुझको..

कि घायल कर गए वो..

और खुद कहे

कि वोही घायल है..

**बबन :** ( खोटे कण्हण्याचा प्रयत्न करीत ) आई गं..

**अनिरूद्ध :** आता बस.. मी कुठेच गेलो नाही.. इथेच होतो दरवाजामागे.. तुझ्या त्या लाल सॉसवाल्या पट्टीला पाहूनच संशय आला होता मला.. कमीतकमी पट्टी तरी नीट बांधायची.. लक्षात ठेव पुढच्यावेळी

**बबन :** सॉरी यार..

**अनिरूद्ध :** ती होलसेल बोलून झालीय आज.. काही म्हण.. तू गेलास लेडीज होस्टेलवर.. मला वाटले किस्सा खतम.. द एंड ऑफ स्टोरी.. पण हे नव्हते अपेक्षित.. एक्स्पेक्ट द अनएक्सेपटेड.. यार.. चिअर अप.. ऍम नॉट ऍंग्री..

**बबन :** ते ठीक यार पण..

**अनिरूद्ध :** पण बिण काही नाही.. माझी एक महत्त्वपूर्ण घोषणा करायची नि मग मी निघतो.. खरोखरचा.. कट्ट्यावर.. या पुढे हनुमानभक्ती बलोपासनेपुरती.. च्यायला.. हे प्रेम.. असल्या युक्त्या करायला शिकवत असेल तर प्रत्यक्षात किती सॉलिड असणार.. व्हॉट इज लाईफ विदाऊट इट.. नो मोअर ब्रह्मचर्य..

**बबन :** वा.. कॉन्ग्रॅट्स.. फक्त कधी नाटक केलेस तर मला फूटपाथ झाडायला नको पाठवूस.. हो काही नाही कविता..

**अनिरूद्ध :** चला.. आज मस्त प्रेमकविता वाचून येतो.. बाय..

*(अनिरूद्ध जातो. बबन आणि कविता एकमेकांकडे हात पसरून जवळ येता येताच प्रकाश मंदावत जातो. )*

**( समाप्त )**

डॉ. नितीन मोरे

वसई येथे छातीरोग तज्ञ म्हणून व्यवसाय असला तरी प्रथम प्रेम लिहीण्याचेच.

या आधी ई साहित्यवर सात पुस्तके प्रकाशित

चक्रमादित्याचा दरबार, केल्याने शीर्षासन, नाच जमूरे नाच, अहम ब्रह्मास्मि, मच्छर टाईम्स, संवादोनी प्रकटावे आणि या कोल्हटकरांच्या घरात: (नाटक )

काही दिवाळी अंकात विनोदी कथा नियमित प्रकाशित होत असतात.

एकूण उपहास, उपहासात्मक विनोद वा निखळ विनोद हे साहित्यातले प्रकार हाताळायला आवडते.

***

# डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे हे व्यवसायाने डॉक्टर असून वसई येथे छातीरोग तज्ञ म्हणून प्रसिद्ध आहेत. मात्र संपूर्ण महाराष्ट्रातील मराठी वाचकांमध्ये ते विनोदाचे बादशहा म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांची आजवर सात पुस्तके प्रसिद्ध झाली असून प्रेमातुराणां हे आठवे पुस्तक आहे.

त्यांना मराठी व इतर भाषा विषयांची आवड असल्याने आणि त्यातूनच लिखाणाची आवड निर्माण झाली.

सामान्यत: आजूबाजूच्या दैंनंदिन घटनांतील विसंगती व त्यातून निर्माण होणारा विनोद हा त्यांचा आवडता विषय आणि त्यातून उपरोधात्मक लिखाण आणि मर्मभेदी टिप्पणी करण्यात ते माहीर आहेत.

डॉक्टरांचे विनोदी कथा व इतर साहित्यकृती नेहमी दिवाळी अंकातून प्रकाशित होत असतात.

**Mobile No. 98209 37490, 98696 73415.**

**Email -** drnmore@yahoo. com

## डॉ. नितीन मोरे यांची साहित्यसंपदा:

चक्रमादित्याचा दरबार,

केल्याने शीर्षासिन,

नाच जमूरे नाच,

अहम ब्रह्मास्मि,

मच्छर टाईम्स,

संवादोनी प्रकटावे

या कोल्हटकरांच्या घरात (नाटक )

प्रेमातुराणां (नाटक)

# ई साहित्य प्रतिष्ठान

**मराठी** भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणाऱ्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार दोनहजार प्रती छापल्या जात. पाच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी.

आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच दहा लाख वाचकांपर्यंत जातं. वर्षाला चाळीसेक लाख डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर फ़ॉरवर्ड करतात. व्हट्स अप, ई मेल, ऍप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायलीत. सुसाट सुटलित. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठिवरच्या प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगाने सुसाट सुटलेल्या मराठीच्या वेगाला आता कोणी थांबवू शकत नाही.

या धूमधडक क्रांतीत सामिल व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही फ़क्त दहा वाचक आणा. ते शंभर आणतील. आणि ते दहाहजार. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला फ़ुकट पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत. आपल्याला टिव्ही पेपर ची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवू.

“Language is the blood of the soul into which thoughts run and out of which they grow.”

– Oliver Wendell Holmes


www. esahity. com वरून डाऊनलोड करा .

esahity@gmail. com ला कळवून मेलने मिळवा .

किंवा7710980841हा नंबर सेव्ह करून या नंबरला तुमचे नांव व गांवWhatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा .

किंवा ई साहित्यचे app. https://play. google. com/store/apps/details?id=com. esahity. www. esahitybooks या लिंकवर उपलब्ध आहेते .download करा .

हे सर्व मोफ़त आहे.

ई साहित्य प्रतिष्ठान®